**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 26.04.2025** **वार- शनिवार**

---

**रोजगार**

केंद्र सरकारच्या सेवेत रूजू झालेल्या तरूण पिढीनं आपलं संपूर्ण आयुष्य नोकरीच्या माध्यमातून देश आणि जनसेवेसाठी समर्पित करावं असं आवाहन केंद्रिय आरोग्यमंत्री जे.पी.नड्डा यांनी आज पुण्यात केलं. पंतप्रधानांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं देशातील 51 हजार नियुक्तीपत्रांचं आज वाटप करण्यात आलं, त्यावेळी पुण्यात आयोजित या कार्यक्रमात ते बोलत होते. केंद्रिय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार मेधा कुलकर्णी, सीजीएसटी आणि जकात पुणे विभागाचे मुख्य आयुक्त मयंक कुमार आणि प्रधान आयुक्त मिहिरकुमार यावेळी उपस्थित होते. पुण्यात दोनशे उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात आली. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ याप्रसंगी बोलताना म्हणाले की, गेल्या दहा वर्षात दहा लाख तरूणांना रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून नोकऱ्या देण्यात आल्या आहेत. नोकरी मिळालेले तरूण-तरूणी देशसेवेसाठी आपलं योगदान देतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

**फडणवीस भेट**

जम्मू काश्मीरमधील पहेलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या कौस्तुभ गणबोटे आणि संतोष जगदाळे यांच्या घरी आज भेट देवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कुटुंबियांचं सांत्वन केलं. आतापर्यंत ज्याप्रमाणे आपण खंबीर राहिलात त्याचप्रमाणेच यापुढेही खंबीर राहावं , राज्यशासन आपल्या दुःखात सहभागी असून आपल्या पाठीशी आहे, अशा शब्दांत फडणवीस यांनी त्यांना धीर दिला.

**नड्डा**

देशात पावणेदोन लाख आयुष्मान आरोग्य मंदिरं बनवण्याचा सरकारचा प्रयत्न असून मोठ्या प्रमाणात जगाला डॉक्टर्स आणि वैद्यकीय कर्मचारी पुरविण्याचा निर्धार केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी आज पुण्यात व्यक्त केला.  सिंबायोसिस रुग्णालय संशोधन केंद्रात नेफ्रोलॉजी आणि युरोलॉजी केंद्राचं उद्घाटन करताना ते बोलत होते. पूर्वी वैद्यकीय शिक्षण आणि सुविधांसाठी परदेशात जावं लागत असे, आज भारतातच जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध झाल्या असून वैद्यकीय महाविद्यालयं सुरु करण्यासाठी असलेली किचकट नियामक प्रणालीही सरकारनं संपवली असल्याचं ते म्हणाले. भारत आणि इतर देशातील विद्यार्थ्यांना एकत्र आणून जगात बंधुभाव निर्माण करणं हा सिंबायोसिसचा उद्देश असून भारताला विश्वगुरु व्हायचं असेल तंत्रज्ञानासोबत अध्यात्माची जोड देणं आवश्यक असल्याचं कुलगुरु डॉ. शां. ब. मुजुमदार यावेळी म्हणाले.

**यशदा**

ग्रामविकासाला अधिक चालना देण्यासाठी जिल्हा परिषदेनं महत्वपूर्ण योगदान द्यावं असं ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी आज पुण्यात

सांगितलं. यशदा इथं ग्रामविकास विभागाच्या दोन दिवसीय कार्यशाळेचा आरंभ करताना ते बोलत होते. ग्रामविकास विभागामार्फत सर्वांसाठी घरे योजना राबविण्यात येत आहे. प्रधानमंत्री आवास योजनेत २० लाख घरांचं उद्दिष्ट पूर्ण करण्यात आलं असून उर्वरित १० लाख घरांना लवकरच मान्यता मिळेल. घरकुलासाठी पात्र लाभार्थ्यांचं सर्वेक्षण तातडीनं पूर्ण करावं, घरकुलांच्या जागेसाठी गायरान, गावठाण इथं जागा उपलब्ध करुन देण्याच्या कामाला विभागीय आयुक्तांनी प्राधान्य द्यावं असं सांगत बचत गटाच्या महिलांच्या उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी 'वूमन मॉल' बनविण्याचे प्रस्ताव तातडीनं सादर करावेत असं सांगून अर्थसंकल्पात यासाठी तरतूद करण्यात आली असल्याचं गोरे यांनी सांगितलं. ग्रामविकास विभागाचे राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, नवीन संकल्पनांची देवाण-घेवाण व्हावी या उद्देशानं ही कार्यशाळा आयोजित केली आहे.

**भारती**

राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत भारती विद्यापीठाला प्रथम क्रमांकावर आणण्याकरीता प्रयत्न करावेत असं आवाहन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी आज पुण्यात केलं. भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुलात 30 व्या स्थापना दिन समारंभात ते बोलत होते. यावेळी विश्वविद्यालयाच्यावतीनं देण्यात येणारा जीवनसाधना गौरव पुरस्कार साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉक्टर तारा भवाळकर यांना यावेळी प्रदान करण्यात आला.

नड्डा

पहलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्याचा बिमोड करून शत्रूला चोख उत्तर देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शक्ती द्यावी, अशी प्रार्थना गणरायाच्या चरणी केली असल्याचं केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी आज पुण्यात सांगितलं. नड्डा यांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचं दर्शन घेतल्यानंतर ते बातमीदारांशी बोलत होते. केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने आदी यावेळी उपस्थित होते.

**आवास**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीनं रावेत प्रधानमंत्री आवास योजनेतील निवड यादी आणि प्रतीक्षा यादी 1 आणि 2 मधील लाभार्थ्यांना "प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" त्या तत्वावर किवळे इथल्या प्रकल्पातील 755 सदनिका उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या प्रकल्पाचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांना संमतीपत्र आणि आवश्यक कागदपत्रं सादर करण्याचं आवाहन महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केलं आहे. अर्जदारांनी 9 मे पर्यंत कागदपत्रं सादर करण्यासाठी मुदत दिली आहे.

**फुटबॉल**

वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन यांच्या वतीनं पुण्यात आयोजित ‘महाराष्ट्र राज्य आंतर-जिल्हा अजिंक्यपद’ फुटबॉल वरिष्ठ गटाच्या स्पर्धेत मुलांच्या गटामध्ये पुणे जिल्हा संघानं रायगड संघाचा 2-1 असा पराभव करून विजयी आरंभ केला. याशिवाय रायगड, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापुर,

अमरावती, नागपूर आणि चंद्रपुर, रायगड हे संघ या स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार**.